| **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८४/२०२६ मधील निशाणी क्र.१ खालील आदेश.**<br>(श्रीशैल कृष्णा भातकांडे वि. महाराष्ट्र सरकार तर्फे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सीमा तपासणी नका, शिनोळी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.) | MHKO140006322026 |
|---|---|

अर्जदार याने सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४९७ व ५०३ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार यांचे मालकीची खालील वर्णनाची टाटा कंपनी एसएफसी. ४०७ बीएस–३ मॉडेलचा टेम्पो त्याचा इंजिन नं.– 497SPTC39BYY611145, चेसीस नंबर– MAT45502688B08582 असा असून त्याचा रजिस्ट्रेशन नंबर–MH-09-CU-8630 ही चंदगड पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी गुन्हा क्र.१९/२०२६ मध्ये आरोपी यांचे ताब्यातून जप्त केली असुन सदरचा गुन्हा हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५(ई) प्रमाणे तपासाकामी राज्य उत्पादन शुल्क विभाग, सीमा तपासणी नाका, शिनोळी, ता. चंदगड यांनी जप्त केलेले आहे. सदर गुन्हयाची तपासणी होवून दोषारोप पत्र दाखल करुन सदर केस गुणदोषावर चालणेस बराचसा कालावधी लागणार आहे. सदरची चारचाकी गाडी ही अर्जदार यांनी व्यवसायीक गरजेकरिता व कामाकरिता सदर वाहनाचा वापर करित आहेत. अर्जदार यांची सदर चारचाकी कार तशीच उभी राहिलेस त्याला गंज येणार आहे, त्याचे इंजिनमध्ये दोष निर्माण होणार आहे. तसेच त्या माल वाहतुक गाडीचे काही पार्टस तुटून पडण्याची तसेच बॅटरी, इंजिन खराब होण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत सदरची चारचाकी गाडी तशीच पडून राहिलेस अर्जदार यांचे कधीही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्जदाराने सदर वाहन हे सुपुर्दनाम्यावर व अटी घालून देण्यास विनंती केली आहे.

३. विद्वान सहायक सरकारी वकील यांनी म्हणणे दिले की, सदर कामातील कागदपत्रे पाहता अर्जदार हेच आरोपी आहेत. तसेच अर्जदाराने त्याचे वाहन बेकायदा वाहतुकीकामीच करीत असलेचे मुद्देमालाच्या quantity वरुन दिसत आहे. मुद्देमालाचे स्वरुप फारच मोठे असून अर्जदाराचा बेकायदा दारु विक्री, वाहतुक व साठवणूक करणे हाच व्यवसाय असलेचे दिसत आहे. त्यामुळे जर सदर अर्ज मंजुर केलेस अर्जदार पुन्हा अशाच प्रकारचा

बेकायदा गुन्हयाचे काम सदर वाहनाचा गैरवापर करणार आहे. तसेच अर्जदाराचे संबंध कोकण, कर्नाटक येथे असलेने सदर वाहनामध्ये फेरबदल अथवा विक्री केलेचे समजून येणार नाही. सबब, सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे दिले की, सदरचे वाहन हे अवैद्य मद्याचा साठा विक्री करण्याच्या हेतूने ठेवलेले असताना जप्त करण्यात आलेला आहे. सदरचे वाहन हे कार्यालयाच्या आवारात सूस्थितीत ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे खराब होण्याची शक्यता नाही. तसेच अवैद्य मद्याचा साठा विक्री करण्याच्या हेतूने ठेवलेले असताना अर्जदार यांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे. सदरचे वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास त्याचा वापर पुन्हा अशा प्रकारे बेकायदेशीर दारु साठा विक्री करणेसाठी करुन महाराष्ट्र शासनाचा महसूल बुडविला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर गुन्हयाच्या चौकशीकामी वाहनाची आवश्यकता असल्यास हजर करण्याची शक्यता दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे जप्त सहाचाकी वाहन सोडण्यात येऊ नये. सदर गुन्हयातील वाहन अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात येवू नये. तसेच जर उपरोक्त वाहन सोडण्याचे आदेश आले तर मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी क्रि.रि.अॅ. नं.६७०, ६७१/२००२, १०९६/२००२ मध्ये दिनांक १७/०८/२००२ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन होणेबाबत विनंती केली आहे. त्यामध्ये त्यांनी निकाल लागेपर्यत जप्त झालेले वाहन सोडण्याच्या संदर्भात काही तत्वे, नियम व अटी ठरविलेल्या आहेत त्याचे पालन व्हावे. तसेच सदर वाहन सोडायचे असेल तर जप्त करण्यात आलेल्या वाहन किंमतीच्या रक्कमेवर ५० टक्के इतक्या रक्कमेचे हमीपत्र घेणेबाबत तपासी अधिकारी यांनी विनंती केली आहे.

५. सरकारतर्फे विद्वान सहायक सरकारी वकील व अर्जदारातर्फे त्याचे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले. अर्जदाराने त्याचे अर्जातील कथनाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र व निशाणी ३ सोबत एफ.आय.आर. दिनांक २४/०६/२०२६ रोजीची सही शिक्याची प्रत, आर.सी. बुकची प्रत, इंन्शुरन्स पॉलिसीची झेरॉक्स प्रत, अर्जदाराचे आधारकार्ड प्रत इ. प्रति अभिलेखावर सादर केलेली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रतीवरुन सदर प्रकरणातील मुद्देमालातील वाहन हे आर.टी. ओ., कोल्हापूर येथे अर्जदाराच्या नावाने नोंदणीकृत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार हा सदर वाहनाचा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

६. चौकशी अधिका–याच्या अहवालावरुन सदर वाहन हे चंदगड पोलिस स्टेशन

येथे गुन्हा क्र.१९/२०२६, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५(ई) प्रमाणे जप्त असल्याचे दिसून येते. तसेच सदर वाहनावर अदयापपावेतो कोणीही हक्क सांगितलेला नाही अथवा त्याबाबत दावा केला नाही. तपास अधिकारी यांचे खुलासावरुन सदर वाहन तपासाकामी आवश्यक असल्याचे दिसून येत नाही. उपरोक्त वाहन हे पोलिस स्टेशनमध्ये उघडयावर ठेवलेले असल्यामुळे त्याचे नुकसान होण्याची व जर अर्जदाराला सदर वाहन सुपुर्दनाम्यावर न दिल्यास त्याची अपरिमीत हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मी या मतापर्यंत आले आहे की, काही अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्जदारास सदर वाहन सुपुर्दनाम्यावर परत देण्याचा आदेश पारित करणे न्यायोचित राहील. वरील कारणांकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज खालील अटी व शर्तीसह मंजुर करण्यात येतो.

२. जप्त टाटा कंपनी एसएफसी. ४०७ बीएस–३ मॉडेलचा टेम्पो त्याचा इंजिन नं.– 497SPTC39BYY611145, चेसीस नंबर– MAT45502688B08582 असा असून त्याचा रजिस्ट्रेशन नंबर–MH–09–CU–8630 रक्कम रुपये १०,००,०००/– (रुपये दहा लाख मात्र) च्या **सुपुर्दनामा बंधपत्रावर अर्जदार श्रीशैल कृष्णा भातकांडे** यांना देण्यात यावा.

३. अर्जदाराने पुढील आदेशापर्यंत अथवा न्यायालयाच्या परवानगी शिवाय जप्त टाटा कंपनीचे चारचाकी वाहन विकू नये, अथवा त्याच्या मुळ स्वरुपात बदल करू नये.

४. तपास अधिकारी यांनी जप्त वाहनांचा ताबा देण्यापूर्वी आवश्यक पंचनामा करावा आणि पंचनाम्यावर चेसीस प्रिंट घेवून वाहनाचे रंगीत फोटो घ्यावे आणि सर्व दस्त अंतिम अहवालासोबत सादर करावे.

५. अर्जदार यांनी स्वत:चे आधारकार्ड, रहिवाशी पत्ता व आर.सी. बुक इत्यादी दस्तऐवजाची साक्षांकित प्रत बंधपत्रासोबत जमा करावी.

६. उपरोक्त अटींचे अर्जदाराने भंग केल्यास बंधपत्रातील रक्कम वसुल करुन शासन जमा करण्यात येईल.

ASHATAI NARAYAN SARAK

Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.07.13 17:50:09 +0530

दिनांकः १३/०७/२०२६. **(ए. एन सरक)**

ठिकाणः चंदगड. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

चंदगड.